सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रासंगीक/विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 909 ठ. क्र. 234
दि. 26/10/15 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



शहरातील विविध उद्याने देखभाल दुरुस्तीकरिता अशासकीय संस्थेस/व्यक्तीस/कंपनी यांना भाडेतत्वावर देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव पहिल्या टप्यातील प्रायोगिक तत्वावर प्रथमतः महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सुशोभिकरण करण्यात येणा-या १३ उद्यानाकरिता देखभाल दुरुस्ती करणेकरिता प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे पर्याय अ.क्र. १) जी उद्याने केवळ देखरेखकरिता देण्याची आहेत. त्याकरिता जाहिर प्रसिध्दीकरणाने टेंडर मागवून सर्वात जास्त दर देणारे देयकार यांच्या समवेत करारपत्र करुन त्या अनुषंगाने देणे. २) ज्या उद्यानात प्रवेश दर आकारणे, एखाद्या विशिष्ट सोयी सुविधेकरिता दर आकारणे (उदा. सार्वजनिक शौचालय किंवा एखाद्या सांस्कृतिक कार्यक्रमकरिता/रिसेप्शन इ.) करिता देणेचे झाल्यास सदर उद्यानाच्या जागेच्या बाजारभाव मुल्यांकनाप्रमाणे भाडयाची रक्कम निश्चित करुन ते काही कालावधी व शर्ती अटीकरिता भाडयाने देणेस्तव सदर प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७९/ब/क/ड मधील नमूद तरतुदीनुसार विषयांकित कामाबाबत धोरण निश्चित करणेस, सदरच्या प्रस्तावास मान्यता मिळणेकामी मा. मंडया नि उद्यान समिती मार्फत मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १-७-१५ चे टिपणीप्रमाणे मा. मंडया नि उद्यान समिती ठराव क्र. ४, दि. ८-७-१५ चे शिफारसीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सोलापूर महानगरपालिकेच्या ताब्यामध्येच बाग राहिली पाहिजे व त्याचे देखभाल दुरुस्ती महानगरपालिकेच्या वतीने करण्यात यावे आणि महानगरपालिकेच्या बागेचे संरक्षणाकरिता सुरक्षा गार्ड नेमणेत यावे तसेच उद्यान विभागाकडे सेवकवर्ग उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१०४ ठ. क्र.२३६
दि. १७/१०/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



सोलापूर शहरास पाणीपुरवठा करणारे, सोरेगांव, उजनी, पाकणी, टाकळी व भवानी पेठ वॉटर वर्क्स केंद्रातील परिसरात उजेड होणेकरिता १६ मी. उंचीचे ४ व १२.५ मि. उंचीचे २ हायमास्ट असे ६ हायमास्ट बसविणे व सोरेगांव, पाकणी वॉटर वर्क्स येथे खांबे घालून १५० वॅट सोडीयम व्हेपर फिटींग बसविणेकामी प्रस्तावात नमूद कारणास्तव सदर कामाकरिता र.रु. ६३,८३,८३०.६५/- इतकेचे पूर्वगणनपत्रक तयार केले असून, सदर काम करुन घेणेस धोरणात्मक निर्णय होणेस व बजेट तरतूद उपलब्ध होऊन मिळणेकामी मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि१३-६-१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

याकामी सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकातील भांडवली कामाच्या खर्चाचा तक्त्यामधील अ.क्र. ८ पाण्याच्या टाक्या बांधणे व पाईप लाईन घालणे/पंप व बीपीटी रिसायक्लिंग करणे या बजेट सदरातून तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

[illegible] कूळ/मामुला/विषय
पत्र [illegible] १०६ ठ. क्र. २३७
दि. १७/१०/१५ राजा ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. ४२ मध्ये करुणा सोसायटी व लोकमान्य सोसायटी कुमठा नाका येथे पिण्याचे पाण्याची पाईप लाईन घालणेकामी प्रस्तावात नमूद कारणास्तव सदर कामाचे पूर्वगणनपत्रक क्र.-/२०१५-१६ र.रु. ८,४९,८३१/- सदर कामास तरतूद उपलब्ध होऊन मिळणेकामी सदरचे प्रकरण मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ३१-५-१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

याकामी सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकातील भांडवली कामाच्या खर्चाचा तक्त्यामधील अ.क्र. ८ पाण्याच्या टाक्या बांधणे व पाईप लाईन घालणे/पंप व बीपीटी रिसायक्लिंग करणे या बजेट सदरातून तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ११३ ठ. क्र. २३८
दि. २५/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



उजनी, पाकणी, टाकळी, सोरेगांव व भवानी पेठ वॉटर वर्क्स केंद्रातील परिसरात अग्निशामक उपकरणे बसविणे तसेच सदर उपकरणे तातडीने खरेदी करणेकामी प्रस्तावात नमूद कारणास्तव सोलापूर शहरास पाणी पुरवठा करणारे सोरेगांव, उजनी, पाकणी, टाकळी व भवानी पेठ ही केंद्रे अत्यावश्यक सेवेतील महत्वाचे केंद्रे असून, सोलापूर शहरास पाणीपुरवठा या सर्व विभागाकडून होतो. प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे एकूण ४१ $CO_2$ एक्स्टिंग्युशर, १२ DCP टाइप फायर एक्स्टिंग्युशर, २० फायर बकेट आणि ५ फायर बकेट स्टॅंड आवश्यक आहेत. तरी सदर उपकरणे तातडीने खरेदी करणे गरजेचे आहे. सदरचे काम करुन घेणेस धोरणात्मक निर्णय होणेस व रुपये २७५४०२.३ बजेट तरतूद उपलब्ध होऊन मिळणेकामी मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ७-७-१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

याकामी सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकातील पान क्र. १०६ वरील खर्च बाजू सार्व. आ. अभियंता कडील अ.क्र. ४ मधील पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्ती या सदरातून बजेट तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ११६ ठ. क्र. २३९ दि. २५/६/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

शहर हद्दवाढ कार्यालयासाठी करंसी काऊटींग मशिन मॅक्सेल कंपनीचे एमएक्स ५० आय मॉडेल एक नग तातडीने खरेदी करणेकामी जाहिरप्रसिध्दीकरणाची अट शिथील करणेस्तव मा. स्थायी समितीकडे मान्यता मिळणेसाठी सादर केले असता, विषय क्र. ८०३ ठराव क्र. ६८६ दिनांक १३-२-१५ अन्वये तूर्त तहकूब असा निर्णय झालेला आहे. प्रकरणी मा. स्थायी समितीत ४५ दिवसापेक्षा जास्त कालावधी लोटला आहे, प्रस्तावात नमूद कारणास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार (मा. शासन राजपत्र असाधारण क्रमांक ४ सन २०११ चे अध्यादेश क्रमांक १२ दिनांक २१-५-२०११ नुसार) सदरचा कार्यवाहीचा अहवाल मा. महानगरपालिकेस पाठविणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक ८-६-१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

**सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~ सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज129 ठ. क्र.240 दि.25/10/15 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव ~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.**

सोरेगाव जलशुध्दीकरण केंद्र, सोलापूर, येथे अंतर्गत रस्ता करणे, दगडी कंपौंड वॉल बांधणे, चेनलिंक फेन्सींग करणे कामाचे पुर्वगणनपत्रक क्र.२/२०१५-१६र.रु १,४३,०१२३९/- यांस मा.स्थापत्य समिती मार्फत मा.म.न.पा.ची मान्यता मिळणेस्तव आणि यांस बजेट तरतुद उपलब्ध होऊन मिळणेकामी मा.आयुक्त यांचे दि.११-०६-२०१५ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. २८, दिनांक १४-७-१५ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

याकामी सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकातील भांडवली कामाच्या खर्चाचा तक्त्यामधील अ.क्र. ८ पाण्याच्या टाक्या बांधणे व पाईप लाईन घालणे/पंप व बीपीटी रिसायक्लिंग करणे या बजेट सदरातून तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

**नगरसचिव**
**सोलापूर महानगरपालिका**

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्रामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढ विषय क्र.ज १३० ठ. क्र. २३७
दि. १६/१०/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



भवानी पेठ, जलशुध्दीकरण केंद्र, सोलापूर येथे संरक्षक भिंत बांधणे कामाचे पुर्वगणनपत्रक क्र.१/२०१५-१६ र.रु ६१,३४,६६७/- यांस मा.स्थापत्य समिती मार्फत मा.म.न.पा.ची मान्यता मिळणेस्तव आणि यांस बजेट तरतुद होऊन मिळणेकामी मा.आयुक्त यांचे दिनांक ११-०६-२०१५ चे टिपणीप्रमाणे मा.स्थापत्य समिती ठराव क्र. २९, दिनांक १४-७-१५ चे शिफारसी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

याकामी सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकातील भांडवली कामाच्या खर्चाचा तक्त्यामधील अ.क्र. ८ पाण्याच्या टाक्या बांधणे व पाईप लाईन घालणे/पंप व बीपीटी रिसायक्लिंग करणे या बजेट सदरातून तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज १३४ ठ. क्र. २४२
दि. २८/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



भवानी पेठ जलशुध्दीकरण केंद्र येथे रस्ता करणे कामाचे पूर्वगणनपत्रक क्र.४/२०१५-१६ र.रु.२१,११,४७२/- बजेट तरतुद उपलब्ध होऊन मिळणेकामी मा.आयुक्त यांचे दि.१/७/२०१५ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. ४६, दिनांक १४-७-१५ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

बजेट तरतूदीबाबत मा. आयुक्त यांना अधिकार देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ९३८ ठ. क्र. 283 दि. २५/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री. सुभाष बळीराम सावस्कर सेवानिवृत्त नगरअभियंता यांचे खातेनिहाय चौकशी प्रकरणी कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव नगरअभियंता या पदासाठी नियुक्ती प्राधिकारी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५ नुसार मा. महानगरपालिका आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदीनुसार श्री. एस. बी. सावस्कर यांच्या विभागीय चौकशीसाठी नियुक्ती प्राधिकारी या नात्याने मा. महानगरपालिकेने मा. आयुक्त यांना प्राधिकृत करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदीनुसार श्री. एस. बी. सावस्कर सेवानिवृत्त नगरअभियंता यांची दोषारोप पत्र बजावून व चौकशी अधिकारी नेमून विभागीय चौकशीची कार्यवाही चालू आहे. त्यामुळे सदर चौकशीसाठी मा. आयुक्त यांना मा. महानगरपालिकेने प्राधिकृत करणेस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत सदरचा प्रस्ताव मा. महानगरपालिका सभेपुढे पाठविणेस मा. आयुक्त यांचे दिनांक १५-१-१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन होऊन मा. सर्वसाधारण ठराव क्र. ३७, दिनांक १३-४-२०१५ अन्वये मा. नूतन आयुक्त यांनी प्रकरण तपासून अभिप्रायासह फेर सादर करणेस मान्यता देणेत येत आहे. असा ठराव पारित करण्यांत आला होता. त्यास अनुसरुन श्री. एस. बी. सावस्कर हे नगरअभियंता या पदावर कार्यरत होते. त्यामुळे नगरअभियंता या पदासाठी नियुक्ती प्राधिकारी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ नुसार मा. महानगरपालिका आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदीनुसार श्री. एस. बी. सावस्कर यांना प्राधिकृत करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदीनुसार श्री. एस. बी. सावस्कर सेवानिवृत्त नगरअभियंता यांची दोषारोप पत्र बजावून व चौकशी अधिकारी नेमून विभागीय चौकशीची कार्यवाही चालू आहे. त्यामुळे सदर चौकशीसाठी मा. आयुक्त यांना मा. महानगरपालिकेने प्राधिकृत करणेस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत सदरचा प्रस्ताव मा. महानगरपालिका सभेपुढे पाठविणेस मा. आयुक्त यांचे दि. १२-७-१५ चे टिपणी प्रमाणे आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

परिणामी वैधते अभावी सांविधानिक तरतुदीनुसार महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मध्ये आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये विभागीय चौकशी सुरु करुन त्यास कार्योत्तर मंजूरीची अजिबात तरतूद नसल्याने सदरचे प्रकरण दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव

सोलापूर महानगरपालिका